रेग्यु. दिवाणी मु.नं.२४/२०
हरिभाउ गावडे वि.सुरेश गावडे
CNR NO.MHST140003522020

<u>नि.२१ खालील आदेश</u>

१. प्रतिवादी नं.१,२, ४ ते १० यांनी प्रस्तुतचा अर्ज हा कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी व कैफियत नाही हा आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुतचे अर्जासोबत शपथपत्र दाखल केले आहे.

२. प्रतिवादींचे म्हणणे की, वादी यानी सदरील दावा हा निरंतर ताकीद व अन्य दादी मंजुर होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींना दावा मान्य व कबुल नाही. प्रतिवादींचे म्हणणे की जगभरात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव होवुन सर्व व्यवहार ठप्प झालेने प्रतिवादीनी कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. प्रतिवादींना कैफियत व म्हणणे दाखल करण्याची संधी मिळणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसे न झाल्यास प्रतिवादींचे कधीही पैशाचे स्वरुपात न भरुन येणारे असे नुकसान होईल म्हणुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जावर आक्षेप घेतला असुन वादीचे म्हणणे असे की, प्रतिवादींनी कैफियत दाखल करण्यास नेमका किती विलंब झाला हे नमुद केले नाही. दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याच्या हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे म्हणणे की यदाकदाचित प्रतिवादींचा अर्ज मंजुर करणेबाबत मे. कोर्टाचे मत झाल्यास प्रतिवादींना जास्ती जास्त कॉस्ट करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. वादी प्रतिवादीचे विधीज्ञांचे पुकारा केला असता गैरहजर. सबब अर्ज वादी प्रतिवादीचा विना युक्तीवाद चालविण्यात आला. अभिलेखानुसार वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. अभिलेखानुसार काही प्रतिवादी हे अदयापपावेतो दाव्यात हजर झाले नाहीत. अभिलेखानुसार उपरोक्त प्रतिवादीविरुध्द विना कैफियतीचा तसेच एकतर्फा आदेश हा पारीत झालेला नाही. दस्तऐवज पाहता प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे हे मुदतीत दाखल करणे अपेक्षीत होते. प्रतिवादींची अर्जातील कारणे पाहता कोव्हीड आजारामुळे न्यायदानाच्या कामावर मर्यादा होत्या त्यामुळे साहिजिकच प्रतिविादींना कैफियत ही दाखल करता आली नाही. कैफियत

दाखल करुन घेतल्यास वादींचे कोणतेही काही नुकसान होणार नाही. उलट दावा गुणदोषावर चालणेसाठी प्रतिवादींना संधी देवून त्यांचे म्हणणे ऐकणे गरजेचे आहे. अर्जातील कारणांचा विचार पाहता अर्ज हा विनाअट मंजुर करणे योग्य होईल म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज नि.२१ मंजुर.

२. प्रतिवादी क्र.१,२ ,४ ते १० यांची कैफियत ही अभिलेखावर विनाअट दाखल करण्यात येत आहे.

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
DN: cn=PANKAJ HILAL PATIL, ou=BOMBAY HIGH COURT, o=BOMBAY HIGH COURT, st=MAHARASHTRA, c=IN
Date: 2022.07.21 15:42:33 +0530

फलटण. (पी.एच.पाटील)
ता.१८/०७/२०२२. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण.